# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.10.2025** **वारःशनिवार**

---

1. आदि कर्मयोगी अभियानात महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्याचा पुरस्कार
2. अवघं जग भारताकडे एक विश्वासार्ह, जबाबदार आणि लवचिक भागीदार म्हणून पहात असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.
3. पहिल्या तेजस लढाऊ विमानाचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते लोकार्पण
4. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत समाप्त; निवडणूक प्रचाराला तेजी आणि
5. डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत, भारताची जोडी उपांत्य फेरीत दाखल.

**राष्ट्रपती**

देशातल्या प्रत्येक आदिवासी गावाला स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने आदिकर्मयोगी अभियान सुरू करण्यात आल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत काल आयोजित करण्यात आलेल्या 'आदि कर्मयोगी अभियान' या विषयावरच्या राष्ट्रीय परिषदेला त्या संबोधित करत होत्या. या अभियानाच्या माध्यमातून आदिवासी समुदाय, राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहात प्रवासात सहभागी होतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. 'धरती आबा जनभागीदारी अभियाना'त सर्वोत्कृष्ट राज्याचा मान महाराष्ट्र राज्याला मिळाला असून, आदि कर्मयोगी अभियानात सर्वोत्कृष्ट कामगिरी पुरस्काराचा मान गडचिरोली जिल्ह्याला प्राप्त झाला आहे. राष्ट्रपतींच्या हस्ते दोन्ही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**पंतप्रधान**

आज अवघं जग भारताकडे एक विश्वासार्ह, जबाबदार आणि लवचिक भागीदार म्हणून पहात आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. एका खाजगी वृत्तसंस्थेनं नवी दिल्लीत आयोजित केलेल्या जागतिक परिषदेत ते काल बोलत होते. इलेक्ट्रॉनिक्सपासून औषधांपर्यंत आणि वाहनांपासून मोबाइलपर्यंतच्या सर्वच उत्पादन क्षेत्रात भारतातली गुंतवणूक वाढत आहे असं सांगून, नुकत्याच झालेल्या करारानुसार युरोपिय देश भारतात शंभर बिलियन डॉलर्सची गुंतवणूक करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. देशाचा महागाई दर दोन टक्क्यांपेक्षा कमी असून विकास दर सात टक्क्यांच्या पुढे गेला आहे असं सांगत, काही काळापूर्वी, कमकुवत पाच अर्थव्यवस्थांमध्ये गणल्या जाणाऱ्या भारतानं आज सर्वोत्तम पाच अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळवलं आहे असं त्यांनी अभिमानानं सांगितलं. सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक आणि ऑपरेशन सिंदूरसारख्या ठोस कारवायांतून देश दहशतवादाला चोख उत्तर देत असल्याचं त्यांनी नमूद केलं. लवकरच भारत नक्षलवाद आणि माओवादी हिंसाचारातून मुक्त झालेला असेल अशी हमी त्यांनी दिली.

**नक्षली-शरणागती**

दरम्यान, सुमारे 200 हून अधिक नक्षलवाद्यांनी काल छत्तीसगढ मधील बस्तर विभागातील जगदलपूर इथे आत्मसमर्पण केलं. यावेळी नक्षलवाद्यांनी त्यांच्याकडील 153 हत्यारं पोलिसांकडे सुपूर्द केली. मार्च 2026 पर्यंत देशाला नक्षलमुक्त करण्याच्या केंद्र सरकारच्या संकल्पपूर्तीच्या दृष्टीने ही घटना महत्वाची मानली जात आहे.

**राजनाथ सिंह**

नाशिकमध्ये निर्माण करण्यात आलेल्या पहिल्या तेजस या लढाऊ विमानाचं लोकार्पण काल संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत झालं. या विमानानं यावेळी आकाशात झेप घेतली. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या ओझर इथल्या प्रकल्पात तेजस च्या तिसऱ्या उत्पादन साखळीचा आणि एचटीटी 40 या प्रशिक्षणार्थी विमानाच्या दुसऱ्या उत्पादन साखळीचा शुभारंभ काल संरक्षणमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. नाशिकमध्येच तयार करण्यात आलेल्या सुखोई 30, एलसीए आणि एचटीटी-40 विमानांच्या उड्डाणांची प्रशंसा करत, ही उड्डाणं देशाच्या स्वावलंबनाने घेतलेली भरारी आहे असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. भारताला संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भर बनवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला. यावेळी बोलताना राजनाथ सिंह म्हणाले.....

**और मुझे पूरा विश्वास है नाशिक आने वाले समय में इन सभी क्षेत्रों में बहुत ही अपनी अहम भूमिका का निर्वाह करेगा यह विश्वास लेकर मैं यहाँ से वापस हो रहा हूँ। और साथियों मुझे यह जानकारी प्राप्त होने पर खुशी हुई है अच्छा लगा है की नाशिक डिवीजन में अब सिविल और मिलिट्री एविएशन दोनों के लिए एक साथ एमआरओ मेंटेंस रिपेयर एंड ओव्हरहॉल की सुविधा स्थापित की गई है। यह दिखाता है की भारत में अब सिविल और मिलिट्री एविएशन दोनों ही एक प्लेटफॉर्म पर मिलकर आगे बढ़ रहे हैं। इस नई शुरुआत के साथ मैं ये भी विश्वास के साथ कह सकता हूँ। इससे नासिक और आसपास के क्षेत्रों में हजारों की संख्या में नए रोजगार के अवसर जॉब अपॉर्च्युनिटीज भी क्रिएट होंगे। यहां के नौजवानों के लिए ट्रेनिंग और एम्प्लॉयमेंट के भी नए रास्ते खुलेंगे और महाराष्ट्र और पड़ोसी राज्यों का भी इंडस्ट्रियल इको सिस्टम इससे और ज्यादा मजबूत होगा।**

**गुजरात-मंत्रिमंडळ विस्तार**

गुजरात मंत्रिमंडळाचा काल विस्तार करण्यात आला. गांधीनगरमध्ये आयोजित कार्यक्रमात, राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नवनिर्वाचीत मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यात, 5 कॅबिनेट दर्जाचे, 3 स्वतंत्र कार्यभार असलेले राज्यमंत्री आणि 12 राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. हर्ष सिंघवी यांना उपमुख्यमंत्रीपद देण्यात आलं असून, कनू देसाई यांना अर्थ, शहरी विकास आणि शहरी गृहनिर्माण खातं देण्यात आलं आहे.

**बिहार-निवडणूक अर्ज**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. पहिल्या टप्प्यात 18 जिल्ह्यांमधील 121 विधानसभा मतदारसंघांसाठी 6 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. उमेदवारी अर्जांची छाननी आज होणार असून, 20 ऑक्टोबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याच्या कालच्या शेवटच्या दिवशी नितीश कुमार सरकारमधील चार मंत्र्यांसह अनेक प्रमुख उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. भाजप उमेदवारांच्या नामांकन प्रक्रियेदरम्यान महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

दरम्यान, राज्यात निवडणूक प्रचाराने जोर धरला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल बिहारमधील सारण येथे पक्षाच्या निवडणूक प्रचाराची सुरुवात केली. सारणमधील तरैया इथल्या प्रचारसभेत बोलताना, शहा यांनी गेल्या दोन दशकांत राज्यात कायदा आणि सुव्यवस्था पुन्हा स्थापित केल्याबद्दल मुख्यमंत्री नितीश कुमार यांची प्रशंसा केली.

**दीपोत्सव**

दीपावलीच्या मंगल पर्वाला प्रारंभ झाला असून सर्वत्र चैतन्याचं वातावरण आहे. काल वसुबारसेनिमित्त सर्वत्र गाय वासरांची पूजा करण्यात आली. आज धनत्रयोदशी आहे. आजच्या दिवशी लक्ष्मी आणि कुबेर यांची पूजा केली जाते; तसंच धन्वंतरी पूजनही केलं जातं.

अयोध्येत कालपासून दीपोत्सवला प्रारंभ झाला. लक्षदिव्यांनी अयोध्यानगरी उजळून निघाली आहे. उद्या संध्याकाळी होणाऱ्या शरयू नदीच्या आरतीला सुमारे 2 हजारांहून आबालवृद्ध नदीतीरावर उपस्थित राहण्याची शक्यता असून, गेल्या वर्षीचा गिनीज विक्रम मागे पडण्याची शक्यता आहे.

**पाकिस्तान-अफगाणिस्तान**

अफगाणिस्तानच्या पक्तिका भागात पाकिस्ताननं केलेल्या हवाई हल्ल्यात काल दोन लहान मुलांसह किमान सहा जणांचा मृत्यू झाला आहे. दोन्ही देशांनी दोन दिवसांचा युद्धबंदी करार केला असतानाही हा हल्ला झाला असं टोलो या वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. अर्गन आणि बारमल जिल्ह्यातल्या रहिवासी भागातहे हवाई हल्ले करण्यात आले.

**मेहुल चोकसी प्रत्यार्पण**

बेल्जियममधील न्यायालयानं फरार हिरे व्यापारी मेहुल चोक्सीला भारताकडे सोपवण्यास मान्यता दिली आहे. पंजाब नॅशनल बँकेची 13 हजार कोटी रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी मेहुल चोक्सी प्रमुख आरोपी आहे. भारताच्या विनंतीवरून अँटवर्प येथील न्यायालयानं काल, बेल्जियम पोलिसांनी केलेली चोक्सीची अटक वैध असल्याचा निर्णय दिला. या निर्णयाविरुद्ध चोक्सी पुढील 15 दिवसांत याचिका दाखल करू शकतो. या कालावधीत याचिका दाखल न झाल्यास अथवा ती फेटाळण्यात आल्यास चोक्सीला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा होईल.

**<u>डिजिटल अटक</u>**

डिजिटल अटकेचा बहाणा करून मुंबईतल्या एका व्यावसायिकाचे 58 कोटी रुपये लुटणाऱ्या 3 आरोपींना महाराष्ट्र सायबर पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान सर्वोच्च न्यायालयानं 'डिजिटल अटक' या सायबर गुन्ह्याबाबत गंभीर दखल घेत केंद्रीय अन्वेषण संस्थेकडून उत्तर मागितलं आहे. हरयाणातल्या अंबाला इथल्या एका ज्येष्ठ नागरिक महिलेच्या तक्रारीनंतर सर्वोच्च न्यायालयाने ही दखल घेतली आहे.

**<u>क्रिकेट-महिला विश्वचषक</u>**

आयसीसी महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत काल दक्षिण अफ्रिकेच्या संघानं श्रीलंकेच्या संघावर 10 गडी राखून विजय मिळवला. पावसामुळे कोलंबो इथला हा सामना 50 षटकांऐवजी 20 षटकांचा करण्यात आला. विजयासाठी आवश्यक 121 धावांचा पाठलाग करताना दक्षिण फ्रिकेच्या संघानं हे लक्ष्य 14 षटकांत एकही गडी न गमावता पार केलं. 47 चेंडूत 60 धावा करणारी ऑस्ट्रेलियाची सलामीची फलंदाज लॉरा वोल्वर्ड सामनावीर ठरली.

**<u>बॅडमिंटन-डेन्मार्क ओपन</u>**

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरी गटात भारताच्या सात्विक साईराज रांकिरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्यपूर्व सामन्यात त्यांनी काल इंडोनेशियाच्या जोडीचा 21-15, 18-21, 21-16 असा पराभव केला. उपांत्यफेरीत भारताच्या जोडीचा सामना जपानच्या ताकुरो होकी आणि युगो कोबायाशी यांच्याशी होणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.